THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 30TH APRIL 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजा गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख ५ माहे मार्च सन १८९६ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असेः—**

### सन १८९६ चा आक्ट ८ वा.

**कस्टम्सच्या बंदरांखेरीज इतर जागीं बाँडेड* वखारी स्थापण्याविषयीं ठराव करण्याबाबद आणि अशा वखारींमध्यें खताअन्वयें मीठ ठेवण्याची सवड देण्याबाबद आक्ट.**

ज्या अर्थीं कस्टम्सच्या बंदरांखेरीज इतर जागीं बाँडेड वखारी स्थापण्याविषयीं ठराव करणें आणि अशा वखारींमध्यें खताअन्वयें मीठ ठेवण्याची सवड देणें इष्ट आहे; त्या अर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) ह्या आक्टास सन १८९६ चा देशांतील बाँडेड वखारींबाबदचा आक्ट असें ह्मणावें; — सरनामा, अर्थ व सुरुवात.

(२) तो सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट ह्याशीं जुळवून वाचिला पाहिजे, आणि तो त्या आक्टाचाच एक भाग आहे असें समजलें पाहिजे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. ह्या आक्टाचीं कलमें ६ ते ७, (दोन्ही धरून), हीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे वेळोवेळीं इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन ह्या बाबतींत ब्रिटिश हिंदुस्थानचे जे भाग ठरवितील, त्या भागांसच मात्र लागू होतील. — व्याप्ति.

**देशांतील बाँडेड वखारी.**

३. (१) सन १८८७ चा खुषकीवरील बाँडेड वखारींबाबद आक्ट हा ह्यावरून रद्द केला आहे. — रद्द करणें.

* ज्या मालावरील ड्यूटीबद्दल मांडवीमध्यें खत लिहून दिलेलें असून जो माल कस्टम्सच्या अमलदारांच्या ताब्यांत ठेविलेला असतो, तो माल भरून ठेवावयाच्या वखारी.

(२) त्या आक्टाविषयीं, सन १८९६ चा कापसाच्या मालावरील जकातीबाबदचा आक्ट, कलम ३, रकम (७) ह्यांत केलेला उल्लेख ह्या आक्टाविषयीं केलेला आहे असें समजून वाचला पाहिजे.

देशांतील बॉंडेड वखारी व त्यांस लागू असणारा कायदा.

४. (१) सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट ह्यांत कोणताही ठराव असला तथापि, कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यास वेळोवेळीं, स्थानिक सरकारची आधीं मंजुरी घेऊन, वखारींत माल भरून ठेवण्याचें बंदर नाहीं अशा कोणत्याही जागीं, सरकारी वखार नेमण्याचा अगर खासगी वखारीस लैसेन्स देण्याचा आणि तशाच मंजुरीनें तशी नेमणूक अगर लैसेन्स रद्द करण्याचा अधिकार आहे.

(२) सदरील प्रकारच्या जागेच्या संबंधानें आणि तेथें नेमलेल्या अगर लैसेन्स दिलेल्या वखारीच्या संबंधानें, कस्टम्सच्या एका बंदराहून कस्टम्सच्या दुसऱ्या बंदरास खत लिहून देऊन आणिलेल्या मालावर कस्टम्सची ड्यूटी घेण्याबाबदचे आणि वखारींत माल भरून ठेवण्याबाबदचे सदहू आक्टांत जे ठराव आहेत त्यांचा अर्थ करणें तो, सदहू जागा हें एक कस्टम्सचें बंदर व वखारींत माल भरून ठेवण्याचें बंदर आहे असें समजून, आणि सदहू वखार ही, प्रसंगाप्रमाणें, सदहू आक्टाअन्वयें तेथें नेमिलेली सरकारी वखार अगर लैसेन्स दिलेली खासगी वखार आहे असें समजून करावा.

(३) सदरील प्रकारच्या वखारींस, आणि मीठ वजन करणें व तें त्या वखारींस घेऊन जाणें या गोष्टींस लागू असलेल्या व या आक्टाच्या सुरुवातीच्या वेळीं अमलांत असलेल्या सर्व कानू, त्या योग्य रीतीनें रद्द केल्या जात तोंपर्यंत किंवा त्यांत योग्य रीतीनें फेरफार केला जाई तोंपर्यंत, तशाच अमलांत राहतील.

(४) सन १८८७ चा खुष्कीवरील बॉंडेड वखारींबाबद आक्ट याच्या ठरावांअन्वयें नेमिलेली किंवा लैसेन्स दिलेली प्रत्येक वखार या आक्टाअन्वयें नेमिलेली किंवा लैसेन्स दिलेली वखार आहे असें मानलें पाहिजे.

### मिठासंबंधी मुदतीबाबदचीं खतें.

खतें लिहून देऊन मीठ देशांतील बॉंडेड वखारींस नेणें.

५. सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट यांत, किंवा या आक्टाचें कलम ४ यांत कोणताही ठराव असला तरी, कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यास, तारवावरून किंवा सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट ह्याअन्वयें नेमिलेल्या किंवा लैसेन्स दिलेल्या वखारींतून काढून आणिलेलें मीठ, याप्रमाणें काढून आणलेल्या मिठावर जी ड्यूटी घ्यावयाची ती पाठीमागून देण्याबाबद लिहून दिलेल्या खताअन्वयें आणि ह्या बाबतींत स्थानिक सरकार ज्या कानू ठरवील त्यांस अनुसरून, कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यानें त्या कारणासाठीं नेमिलेल्या अगर लैसेन्स दिलेल्या वखारीस, नेण्याची परवानगी देण्याचा अखत्यार आहे.

खताचा नमुना.

६. गेल्या शेवटल्या कलमांतील ठरावांस अनुसरून करून द्यावयाचें प्रत्येक खत ह्यास जोडलेल्या नमुन्याबरहुकुम असलें पाहिजे, किंवा, तो नमुना लागू नसेल अगर पुरेसा नसेल तेव्हां, कस्टम्सचा मुख्य अधिकारी वेळोवेळीं ठरवील तशा इतर नमुन्याबरहुकुम असलें पाहिजेः

मात्र इतकेंच कीं, अशा खतांत दाखल केलेल्या मिठावर जी ड्यूटी घ्यावयाची ती देण्याकरितां त्या खतांत दिलेली मुदत, तें सगळें मीठ खपण्यास वाजवी रीतीनें जी मुदत लागेल असें वाटत असेल तिच्यापेक्षां जास्त असतां कामा नये, व ती, कोणत्याही बाबतींत, साहा महिन्यांपेक्षां जास्त असतां कामा नयेः

मात्र असेंही ठरविलें आहे कीं वखारींतून जेवढें मीठ दिलें असेल तेवढ्या मिठापुर्ती ड्यूटी भरावयास कोणत्याही वेळीं सांगण्यास कस्टम्सचा मुख्य अधिकारी मुखत्यार आहे.

७. स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजूरी घेऊन, खालील बाबतींच्या संबंधानें ह्या आक्टाच्या ठरावांस अनुरूप अशा कानू करण्याचा अख्त्यार आहे :— कानू करण्याचा अधिकार.

(१) कलम ९ अन्वयें वखारी नेमण्याच्या किंवा वखारींस लैसेन्स देण्याच्या संबंधानें;

(२) अशा वखारींची सरकारी अमलदारांकडून तपासणी होण्याच्या संबंधानें ;

(३) सदर्हू कलमांतील ठरावांअन्वयें स्थलांतर करण्यांत येत असलेल्या मिठाच्या सुरक्षित कबज्याच्या संबंधानें ;

(४) सदर्हू कलमाअन्वयें नेमिलेल्या किंवा लैसेन्स दिलेल्या वखारींतून मीठ काढून नेण्याच्या संबधानें;

(५) सदर्हू कलमांतील ठरावांबरहुकुम खत लिहून देणाऱ्या मनुष्याकडून कोणत्या प्रकारचें तारण घ्यावयाचें त्या संबधानें आणि अशा खता-अन्वयें वसूल व्हावयाची रकम कोणत्या वेळीं व कोणत्या जागीं भरावयाची त्या संबंधानें; आणि

(६) साधारणतः, सरकारी महसूल सुरक्षित करण्यास ज्या इतर गोष्टींची जरूरी आहे असें वाटेल त्या इतर गोष्टींच्या संबंधानें.

८. कलम ५ किंवा कलम ६ यांतील कोणत्याही ठरावावरून, जें मीठ ज्या कोणत्याही रीतीनें त्या त्या वेळीं ४थ्या कलमाअन्वयें कायदेशीर प्रकारें काढून नेण्याजोगें असेल तें मीठ त्या रीतीनें काढून नेण्यास मनाई होते असें समजूं नये. कायम ठेवणें.

## खताचा नमुना.

(कलम ६ पाहा.)

सन १८९ चा नंबर

मी अ. ब., हल्लीं वस्ती व मी क. ड., ठिकाण मजकूरचा राहाणार, येणेंप्रमाणें आह्मी मलिका माअझमांचे हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल ह्यांस सरकारी रुपयांची रकम द्यावयाची तिजबद्दल सदर्हू सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल ह्यांस एकाजतीं एकामतीं व प्रत्येकीं बांधलेले असून ती रकम देण्यासाठीं आह्मी आपल्या स्वतःस व आमच्या कायदेशीर वारस्यांस एकाजतीं एकामतीं व प्रत्येकीं बांधून देतों.

(तारीख)

(सही)

सदर्हू बांधलेले यांनीं येथील मांडवी स्वाधीन असणाऱ्या अमलदारास, खालीं लिहिलेला माल, ह्मणजे, येथून तारवांतून जलमार्गानें आणिलेलें व त्या मांडवीचे बुकांत, जलमार्गानें आणलेल्या मालाच्या रजिस्टरापैकीं नंबर ह्मणून नोंदलेलें मण मीठ, सन १८९६ चा देशांतील बाँडेड वखारींबाबदचा आक्ट ह्याअन्वयें नेमिलेल्या किंवा लैसेन्स दिलेल्या येथील वखारींत महिन्यांच्या मुदतीपर्यंत ठेवण्याविषयीं अर्ज करून त्याबद्दल परवानगी मिळविली आहे;

त्या अर्थीं या खताची शर्त अशी आहे कीं.

वखारींत ठेविलेल्या मालाच्या मालकांनीं व सन १८९६चा देशांतील बाँडेड वखारींबाबदचा आक्ट ह्यांतील ठरावांअन्वयें माल वखारींत ठेवण्याची परवानगी मिळालेल्या मनुष्यांनीं सदर्हू आक्टाअन्वयें ठरविलेल्या ज्या कानूंप्रमाणें चाललें पाहिजे त्या सर्व कानूं-

प्रमाणें सदर्हू किंवा त्यांचे कायदेशीर वारचे चालतलि तर;

आणि कस्टम्सच्या ड्यूटी अगर इतर कायदेशीर चार्ज हीं धरून जीं कोणतींही देणीं सदर्हू मिठावर मागितलीं जाण्यास पात्र होतील अथवा त्या मिठाच्या बाबतींत लागू झालेल्या गुन्हेगारीच्या संबंधानें जीं कोणतींही देणीं मागितलीं जाण्यास पात्र होतलि तीं सर्व देणीं, आणि बंदर येथील मांडवी स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें तीं देण्याविषयीं लेखी मागणी केल्याचे तारिखेपासून सदर्हू दरेक रकमेचें दरसाल दरशेंकडा साहा टक्क्यांप्रमाणें व्याज होईल तें या खताचे तारिखेपासून मुदतींत सदर्हू किंवा त्यांचे कायदेशीर वारचे, सदर्हू मांडवी स्वाधीन असणाऱ्या अमलदारास अगर येथील कलेक्टरास देतील तर;

आणि ज्या ज्या कस्टम्सच्या ड्यूटी व इतर कायदेशीर चार्ज, गुन्हेगारीच्या रकमा व व्याज, सदर्हूप्रमाणें मागितलीं जाण्यास पात्र असतील त्या सगळ्यांची संपूर्ण रकम भरण्यासाठीं सदर्हूप्रमाणें ठरविलेल्या मुदतींत, किंवा कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यानें आणखी कांहीं मुदत दिलेली असल्यास त्या मुदतींत, ती संपूर्ण रकम सदर्हू सगळ्या मिठावर जर प्रथमतः देण्यांत आली तर;

ही जबाबदारी रद्द होईल;

नाहींतर ही जबाबदारी अमलांत राहील, व त्याचप्रमाणें या शर्तींच्या कोणत्याही भागाचा भंग करण्यांत आला असतां किंवा त्या भागाप्रमाणें चालणें न झालें असतां ही जबाबदारी अमलांत राहील.

(तारीख)

(सही) ( )

एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख १३ माहे मार्च सन १८९६ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असेः—**

## सन १८९६ चा आक्ट ११ वा.

### सन १८७९ चा वकिली करणारांबाबद आक्ट सुधारण्यासाठीं आक्ट.

ज्या अर्थीं सन १८७९ चा वकिली करणारांबाबद आक्ट सुधारणें योग्य आहे, त्या अर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

सन १८७९ चा आक्ट १८ वा, कलम ३, ह्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

१ सदर्हू आक्टाच्या ३ ऱ्या कलमांत खालील मजकुर जास्त दाखल करावाः तो येणेंप्रमाणें :—

"दलाल."

" 'दलाल' या शब्दाचा अर्थ, जो मनुष्य, कोणत्याही वकिली करणारास, त्याकडून मिळणाऱ्या कोणत्याही मेहनतान्याच्या मोबदला, कोणत्याही कायद्यासंबंधी कामांत नेमून देतो, अगर, अशा मेहनतान्याच्या मोबदला, कायद्यासंबंधी कोणत्याही कामांत नेमून देण्याची त्याला सूचना करितो, तो मनुष्य, असा आहे."

सन १८७९ चा आक्ट १८ वा, कलम १३, ह्याच्या बदला नवीन कलम दाखल करणें.

२. सदर्हू आक्टाच्या १३ व्या कलमाच्या बदला खालील कलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

धंद्यास अनुचित अशा रीतीच्या वर्तणुकीबद्दल प्लीडर व मुखत्यार ह्यांस सस्पेंड व बर्तर्फ करणें.

"१३. हाय कोर्ट, त्यास योग्य वाटेल तशी चौकशी केल्यानंतर, सदरीं सांगितल्याप्रमाणें सर्टिफिकेट धारण करणाऱ्या कोणत्याही प्लीडरास अगर मुखत्यारास—

(अ) तो प्लीडर अथवा मुखत्यार, कोणत्याही मुकदम्यांत, आपल्याला ज्या पक्षकाराच्या तर्फे राखून ठेविलेलें असेल त्या पक्षकाराशिवाय अथवा जो मनुष्य दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा ह्याच्या अर्थाअन्वयें अशा पक्षकाराचा मंजूर केलेला एजंट असेल त्या मनुष्याशिवाय अथवा तो मुकदमा समजून देण्यास त्या पक्षकारानें अधिकार दिलेला कोणी नोकर, नातेवाईक अगर मित्र याशिवाय इतर कोणाकडून तो मुकदमा समजून घेईल तर, त्याबद्दल, अगर

(ब) तो प्लीडर अथवा मुखत्यार, आपल्या धंद्यासंबंधी काम चालविण्याच्या बाबतींत दगलबाजीचें अगर अतिशय अयोग्य असें वर्तन केल्याचा अपराधी होईल तर, त्याबद्दल, अगर

(क) तो प्लीडर अथवा मुखत्यार, कोणत्याही कायद्यासंबंधी कामांत आपल्यास अगर इतर कोणत्याही प्लीडरास किंवा मुखत्यारास नेमून देण्याबद्दल अगर नेमून दिल्याबद्दल आपल्या कामाकरितां आपल्यास दिलेल्या किंवा द्यावयाच्या कोणत्याही फींतून कोणतीही देणगी देऊं लागेल, देईल अगर ठेऊन घेण्यास संमति देईल, तर, त्याबद्दल, अगर

(ड) तो प्लीडर अथवा मुखत्यार, आपल्यास असा प्लीडर अगर मुखत्यार ह्मणून नेमून घेण्यासाठीं ज्या कोणत्याही मनुष्यास त्यानें कोणताही मेहनताना दिलेला असेल अगर देण्यास कबूल केलेलें अगर वचन दिलेलें असेल त्या मनुष्याच्या मार्फत अगर मध्यस्थीनें, प्रत्यक्ष अगर परोक्ष रीतीनें, आपल्यास तसा प्लीडर अथवा मुखत्यार नेमून घेईल अगर नेमून घेण्याचा प्रयत्न करील, तर, त्याबद्दल, अगर

(इ) तो प्लीडर अथवा मुखत्यार, ज्या मनुष्यास कलम ३६ अन्वयें जाहिरनाम्यानें दलाल ह्मणून प्रसिद्ध केलें असेल त्या मनुष्यामार्फत कोणत्याही कायद्यासंबंधी कामांत झालेली नेमणूक पत्करील, तर, त्याबद्दल, अगर

(फ) इतर कोणत्याही वाजवी कारणाबद्दल,

सस्पेंड अगर बर्तर्फ करण्यासही मुखत्यार आहे.

सन १८७९ चा आक्ट १८ वा, कलम २२, ह्याच्या ऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

धंद्यास अनुचित अशा रीतीच्या वर्तणुकीबद्दल रेव्हिन्यू एजंटास सस्पेंड व बर्तर्फ करणें.

३. सदरहू आक्टाच्या २२ व्या कलमाच्या ऐवजीं खालील कलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

"२२. निर्बंध ठेवणारा मुख्य मुलकी अधिकारी, त्यास योग्य वाटेल तशी चौकशी केल्यानंतर, सदरहूप्रमाणें दिलेलें सर्टिफिकेट धारण करणाऱ्या कोणत्याही रेव्हिन्यू एजंटास—

(अ) तो रेव्हिन्यू एजंट, आपल्या धंद्यासंबंधी काम चालविण्याच्या बाबतींत दगलबाजीचें अगर अतिशय अयोग्य असें वर्तन केल्याचा अपराधी होईल, तर, त्याबद्दल, अगर

(ब) तो रेव्हिन्यू एजंट, कोणत्याही कायद्यासंबंधी कामांत आपल्यास अगर इतर कोणत्याही रेव्हिन्यू एजंटास नेमून देण्याबद्दल अगर नेमून दिल्याबद्दल आपल्या कामाकरितां आपल्यास दिलेल्या किंवा द्यावयाच्या कोणत्याही फींतून कोणतीही देणगी देऊं लागेल, देईल अगर ठेऊन घेण्यास संमति देईल, तर, त्याबद्दल, अगर

(क) तो रेव्हिन्यू एजंट, आपल्यास असा रेव्हिन्यू एजंट ह्मणून नेमून घेण्यासाठीं ज्या कोणत्याही मनुष्यास त्यानें कोणताही मेहनताना दिलेला असेल अगर देण्यास कबूल केलेलें अगर वचन दिलेलें असेल त्या मनुष्याच्या मार्फत किंवा मध्यस्थीनें, प्रत्यक्ष अगर परोक्ष रीतीनें, आपल्यास तसा रेव्हिन्यू एजंट नेमून घेईल अगर नेमून घेण्याचा प्रयत्न करील, तर, त्याबद्दल, अगर,

(ड) तो रेव्हिन्यू एजंट, ज्या मनुष्यास कलम ३६ अन्वयें जाहिरनाम्यानें दलाल ह्मणून प्रसिद्ध केलें असेल त्या मनुष्यामार्फत कोणत्याही कायद्यासंबंधी कामांत झालेली नेमणूक पत्करील, तर, त्याबद्दल, अगर

(इ) इतर कोणत्याही वाजवी कारणाबद्दल,

सस्पेंड अगर बर्तर्फ करण्यासही मुखत्यार आहे.

४. सदर्हू आक्टाच्या ३६ व्या कलमाच्या बदला खालील कलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

सन १८७९ चा आक्ट १८ वा, कलम ३६, ह्याच्या बदला नवीन कलम दाखल करणें.

दलालांच्या यादी तयार करून जाहीर करण्याचा अधिकार.

"३६. दरेक हे कोर्टास, डिस्ट्रिक्ट जज्जास, सेशन जज्जास, डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटास व प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास, जिल्ह्याच्या कलेक्टरहून कमी दर्जाचा नाहीं अशा दरेक मुलकी अमलदारास, आणि दरेक प्रेसिडेन्सी स्मॉल कॉज कोर्टाच्या चीफ जज्जास (त्याच्या त्याच्या कोर्टाच्या संबंधानें आणि त्या कोर्टाच्या हुकुमतीखालीं कोर्टें असल्यास त्या कोर्टांच्या संबंधानें), जे मनुष्य, त्यांच्या साधारण कीर्तीच्या पुराव्यावरून अगर इतर रीतीनें, दलालाप्रमाणें हमेश काम करीत असतात अशी आपल्या खातरीलायक शाबिती करण्यांत येईल, त्यांच्या यादी तयार करून प्रसिद्ध करण्याचा आणि वेळोवेळीं अशा यादींमध्यें फेरफार करण्याचा व त्या सुधारण्याचा अख्त्यार आहे.

(२) अशा यादींत कोणत्याही इसमाचें नांव दाखल करावयाचें तें, त्याला, त्याचें नांव त्या यादींत दाखल कां करूं नये ह्याबद्दल कारण दाखविण्याची संधी दिल्याशिवाय, दाखल करूं नये.

(३) अशा प्रत्येक यादीची एक प्रत, ती ज्या कोर्टाबद्दल असेल त्या कोर्टांत टांगून ठेविली पाहिजे.

(४) अशा कोणत्याही यादींत ज्याचें नांव दाखल केलेलें असेल, त्या कोणत्याही मनुष्यास, सामान्य अगर विशेष हुकुमाच्या द्वारें, कोर्टाच्या हद्दींतून दूर करण्याचा सदरहू कोर्टास अगर जज्जास अधिकार आहे.

(५) ज्या कोणत्याही मनुष्याचें नांव अशा कोणत्याही यादींत दाखल केलेलें असेल, तो प्रत्येक मनुष्य, कलम १३, रकम (इ) आणि कलम २२, रकम (ड), यांच्या अर्थाअन्वयें जाहीरनामा करून दलाल ह्मणून प्रसिद्ध केलेला आहे असें समजलें पाहिजे.

(सही) एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट, आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ३० माहे मार्च सन १८९६ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९६ चा आक्ट १३ वा.

### सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा सुधारण्याबाबद आक्ट.

ज्याअर्थीं सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या २६९ व्या कलमाची सुधारणा.

१. (१) सदरहू कायद्याच्या २६९ व्या कलमाच्या पहिल्या वाक्यांत "स्थानिक सरकाराला" या शब्दांनंतर "गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजूरी घेऊन व" हे शब्द, आणि "आणि तसेंच" या शब्दांनंतर "सदरहू प्रकारच्या मंजुरीनें" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

(२) त्याच कलमाच्या पहिल्या वाक्यानंतर खालील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:

"तसेंच स्थानिक सरकाराला, सदरहू प्रकारचा हुकूम करून, ज्या कोणत्याही जिल्ह्यांत ज्या कोणत्याही अपराधाचा इन्साफ जूरीकडून झाला पाहिजे त्या जिल्ह्याच्या बाबतींत, अशा अपराधाचा इन्साफ, स्पेशल जूरीच्या यादींतून समन्स करून बोलाविलेल्या जूररांकडून व्हावा असें जज्ज, त्यास अर्जी केल्यावरून किंवा आपण होऊन फर्मावील, तर त्याप्रमाणें तो इन्साफ झाला पाहिजे, असें ठरविण्याचा, आणि असा हुकूम रद्द करण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा अधिकार आहे."

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या २७६ व्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू कायद्याच्या २७६ व्या कलमांतील "तिसऱ्यानें" या शब्दापूर्वींचा "आणि" हा शब्द रद्द केला पाहिजे, आणि त्याच कलमाच्या शेवटीं खालील मजकूर जास्त दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:

"आणि

**चवथ्यानें**, विवक्षित अपराधांचा इन्साफ स्पेशल जूरीकडून होण्याविषयीं मोकळीक आहे असें ज्या कोणत्याही जिल्ह्याबद्दल स्थानिक सरकारानें ठरविलें असेल त्या जिल्ह्यांत, कलम ३२९ अ यांत सांगितलेल्या स्पेशल जूरीच्या यादींतून जूरर पसंत केले पाहिजेत असें जज्ज ज्या कोणत्याही खटल्यांत फर्मावील त्या खटल्यांत ते त्याप्रमाणें पसंत केले पाहिजेत."

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३०७ व्या कलमाची सुधारणा.

३. (१) सदरहू कायद्याच्या ३०७व्या कलमांत "इतकें अगदीं भिन्न असेल कीं इन्साफ बरोबर होण्यासाठीं तें खटलें हैकोर्टाकडे पाठविणें अवश्य आहे असें त्या जज्जास" या शब्दांच्याबदला "भिन्न असेल व इन्साफ बरोबर होण्यासाठीं तें खटलें हैकोर्टाकडे पाठविणें अवश्य आहे असें त्या जज्जास स्पष्टपणें" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

(२) त्याच कलमांत "परंतु तयार केलेल्या व ज्यूरीपुढें ठेवलेल्या चार्जावरून ज्या अपराधाची शाबिती आरोपितावर ज्यूरी करूं शकती, तो अपराध त्यानें केला नाहीं किंवा तो अपराध त्यावर शाबित झाला असा ठराव करण्याचा अधिकार है कोर्टास आहे;" या शब्दांच्याबदला "आणि तयार केलेल्या व ज्यूरीपुढें ठेविलेल्या चार्जावरून ज्या अपराधाची शाबिती आरोपितावर ज्यूरी करूं शकती, तो अपराध त्यानें केला नाहीं किंवा तो अपराध त्यावर शाबीत झाला असा ठराव, सदरहू कोर्टानें सदरहू अधिकारांस पात्र राहून, आणि दरोबस्त पुराव्याचा विचार करून व सेशन-जज्जाच्या आणि ज्यूरीच्या मतांकडे योग्य लक्ष पुरवून, केला पाहिजे;" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३१९ व्या कलमाची सुधारणा.

४. सदरहू कायद्याच्या ३१९ व्या कलमांत "त्या जिल्ह्यांत" या शब्दांनंतर खालील शब्द दाखल केले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें:

"किंवा स्थानिक सरकारानें स्थानिक हकीकतीचा विचार करून या बाबतींत इतर कोणताही प्रदेश नेमलेला असल्यास, याप्रमाणें नेमलेल्या प्रदेशांत."

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३२५ व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

५. सदरहू कायद्याच्या ३२५ व्या कलमानंतर खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:

स्पेशल ज्यूररांची यादी तयार करणें.

"३२५ अ. ज्या कोणत्याही जिल्ह्याबद्दल स्थानिक सरकारानें, विवक्षित अपराधांचा इनसाफ, जज्ज तसें फर्मावील तर, स्पेशल ज्यूरीकडून झाला पाहिजे असें ठरविलें असेल, त्या जिल्ह्याच्या बाबतींत, सेशन-जज्जानें, व त्या जिल्ह्याच्या कलेक्टरानें किंवा सदरहू दुसऱ्या अमलदारानें, यांत पूर्वी सांगितलेल्या तपासलेल्या यादीखेरीज आणखी, अशा तपासलेल्या यादींत ज्या ज्यूररांचीं नांवें दाखल केलेलीं असून जे मिळकतीच्या, लौकिकाच्या किंवा शिक्षणाच्या संबंधानें विशेष लायक असल्याकारणानें अशा सेशन-जज्जाच्या व कलेक्टराच्या किंवा सदरहू दुसऱ्या अमलदाराच्या मतें, स्पेशल ज्यूररांचें काम करण्यास योग्य असतील तशा ज्यूररांचीं नावें दाखल करून एक स्पेशल यादी तयार केली पाहिजे: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं अशा स्पेशल यादींत कोणत्याही मनुष्याचें नांव दाखल केल्यानें, तपासलेल्या यादींतून त्याचें नांव काढतां येतें असें व तसेंच स्पेशल ज्यूरीकडून इनसाफ न होणाऱ्या खटल्यांमध्यें साधारण ज्यूरर म्हणून काम करण्याच्या त्याच्या पात्रतेपासून तो मुक्त होतो असें कधींच समजूं नये."

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३२६ व्या कलमाची सुधारणा.

६. सदरहू कायद्याच्या ३२६व्या कलमांत "सदरहू तपासलेल्या यादींतील" या शब्दांनंतर "किंवा सदरहू स्पेशल यादींतील" हे शब्द दाखल केले पाहिजेत, आणि त्याच कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांतील "तपासलेल्या यादींतील मनुष्यांपैकीं" हे शब्द गाळले पाहिजेत.

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३३० व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

७. सदरहू कायद्याच्या ३३० व्या कलमानंतर खालील कलम जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:—

कोर्टाला स्पेशल ज्यूररांस बारा महिनेपर्यंत ज्यूरर ह्मणून पुनः काम करण्याच्या पात्रतेपासून मुक्त करण्याचा अधिकार आहे.

"३३० अ. सेशन-कोर्टाला, त्यास योग्य वाटेल तर, स्पेशल ज्यूरीकडून होणाऱ्या कोणत्याही इनसाफाच्या शेवटीं असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं अशा ज्यूरींत ज्या ज्यूररांनीं काम केलें आहे त्यांना बारा महिन्यांच्या मुदतीपर्यंत ज्यूरर ह्मणून पुनः काम करण्यासाठीं समन्स करून बोलावूं नये."

एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.